# सौजन्याची ऐशीतैशी

"दहा वेळा फोन केले, पत्रव्यवहार केला, ईमेल पाठवले... पण कशावर काही उत्तरच देत नाहीत हो..", विद्याताई अगदी काकुळतीला येऊन बोलत होत्या, "होकार असेल तर होकार कळवावा, नकार असेल तर नकार कळवावा... पण जीव टांगणीला लावून ठेवण्यात यांना काय आनंद मिळतो देव जाणे.", आता त्यांच्या डोळ्यातून पाणी येणं तेवढं बाकी राहिलं होतं. महत्प्रयासाने त्यांनी आपले अश्रू अडवले होते. मुलीच्या लग्नाची चिंता त्यांना सतावत होती. विद्या ताईंसारखे असंख्य मुलींचे आई वडील मी गेल्या पंधरा वर्षात बघितले आहेत. एकविसावं शतक उजाडलं तरी पुरोगामी, प्रगतीशील महाराष्ट्रात वर पालक वधू पालकांना असं का वागवतात असा प्रश्न मला पडत असे. हळू हळू मात्र हे चित्र बदलत गेलं. आणि सगळ्यात मोठा बदल असा झाला की आजकाल वधू पालक देखील वर पालकांशी याच पद्धतीने वागताना दिसू लागले आहेत! घ्या.. 'An eye for an eye makes whole world blind' असं जे इंग्रजीत म्हणलं जातं तसंच झालं की हे. जशास तसे वागून सगळेच आंधळे!

पाहून लग्न करताना म्हणजेच अरेंज मैरेज करताना साहजिकच बघण्याचे कार्यक्रम होतात, पसंती नापसंती होते. पसंती झाली तर प्रश्नच येत नाही. पण नापसंती झाली तर सांगणार कसं हा मोठाच प्रश्न आजकाल पालकांना पडू लागला आहे. तीस चाळीस वर्षांपूर्वी मुलाच्या पालकांनी मोठ्या तोऱ्यात 'मुलगी पसंत नाही' असं सांगणं खपून जात होतं कारण तेव्हा मुलीचे पालक हे काहीसे दबलेले आणि ओझ्याखाली असत. पुढे पुढे मुली शिकू लागल्या, आत्मनिर्भर होऊ लागल्या तसं मुलाकडच्यांचा तोरा जरा कमी झाला तरी आपणहोऊन नापसंती कळवावी असं त्यांना वाटत नसे. आणि आता समोरच्याला आपला निर्णय कळवण्याची गरज हळूहळू मुलीकडच्यांना देखील वाटेनाशी झाली आहे. प्रतिभाताई माझ्याकडे आल्या तेव्हा त्यांनी सगळ्या गोष्टी त्याच सांगितल्या ज्या विद्या ताईंनी सांगितल्या होत्या. फरक इतकाच की प्रतिभाताई मुलाच्या लग्नाच्या चिंतेत होत्या. बरे, हे फक्त लग्नेच्छू मुला-मुलींच्या पालकांच्या बाबतीत घडतं असा अनेकांचा गैरसमज असण्याची शक्यता आहे. पण पुढच्या पिढीत, म्हणजे लग्नेच्छू मुलामुलींमध्येही हीच वर्तणूक असल्याचं दिसून येतं. वर्षानुवर्षे कार्यरत असणाऱ्या प्रथितयश विवाहसंस्थांच्या वेबसाईट आहेत. यावर अनेकदा एक सोय असते ती म्हणजे 'सेंड इंटरेस्ट'. म्हणजे एखाद्या मुलाला किंवा मुलीला आपल्याला अनुरूप असे प्रोफाईल वाटले तर त्याला इंटरेस्ट पाठवता येतो. अगदी फेसबुक फ्रेंड रिक्वेस्ट सारखा. पण इथे गोष्ट निव्वळ फेसबुक मैत्रीची नाही. एकप्रकारे हा लग्न ठरवण्यासाठी एक पाउल पुढे जाण्याच्या दृष्टीने ठेवलेला प्रस्ताव असतो. त्याला त्याचे एक गांभीर्य आहे. पण तरीही अनेकदा असं दिसून येतं की कित्येकजण याला देखील उत्तर देत नाहीत. ना तो इंटरेस्ट स्वीकारतात, ना अव्हेरतात. सदैव समोरचे लोक विरोधी पक्षाचे असल्यासारखे मानून केली जाणारी ही वागणूक, माध्यम बदललं तरी, जुन्या-नव्या पिढीत सारखीच आहे. आणि एकूणच अहंगंडांच्या या लढाईत खऱ्या अर्थाने मारले जाते ते 'सौजन्य'.

लहानपणी शाळेत आपल्यातल्या प्रत्येकाने पाठ्यपुस्तकांच्या पहिल्या पानावर असणारी प्रतिज्ञा म्हणली आहे. अर्थातच शाळेच्या अभ्यासातल्या गोष्टी शाळेतच विसरण्याचा आपला शिरस्ता असल्याने प्रतिज्ञेत असणारे एक वाक्य आपण साफ विसरून गेलो आहोत. 'प्रत्येकाशी सौजन्याने वागेन.' वाक्य आपण

विसरलो आहोतच पण त्याचा अर्थ ना तेव्हा कधी कळला ना आताही आपण लक्षात घेतो. सौजन्य म्हणजे नुसता नम्रपणा नव्हे. सौजन्य म्हणजे निव्वळ आदराने वागणेही नव्हे. सौजन्य म्हणजे दुसऱ्याचा विचार करून वागणे. दुसऱ्याचा विचार केल्यावर माणूस आपोआप नम्र आणि आदरपूर्वक वागेलच. 'आपल्यासाठी समोरचे लोक थांबले असतील, आपल्या निर्णयाची वाट बघत असतील' हा दुसऱ्याचा विचार केल्यास स्वाभाविकपणे माणूस फोन उचलणार आणि समोरच्या लोकांना आपला निर्णय नम्रपणे कळवणार. याला म्हणतात सौजन्य. दैनंदिन जीवनात देखील सौजन्य जपण्याचा आपण प्रयत्न करत नाही ही मोठी दुर्दैवाची बाब आहे. कित्येकदा 'दुपारी २ वाजता भेटायला येतो' असं म्हणून दिवस मावळला तरी हे लोक उगवत नाहीत. तुमच्यासाठी कोणीतरी थांबलं असेल, वाट बघत असेल, हा सौजन्याचा विचारच नाही. उशीर होणार असेल, जमणार नसेल तर कळवण्याची साधी तसदीदेखील अनेकजण घेत नाहीत. माहिती तंत्रज्ञान इतकं पुढारलेलं आहे आता. फोन, मोबाईल, मग एसएमएस, आजकाल वॉट्सऐप वगैरे कितीतरी गोष्टी आल्या आहेत. एक संदेश जगाच्या या टोकापासून दुसऱ्या टोकाला पोहचवणे ही काही फार कठीण गोष्ट उरली नाही. मग अगदी साध्या साध्या बाबतीत का बरं लोक सौजन्य पाळत नसतील? लग्नासारख्या आयुष्यातल्या महत्वाच्या बाबतीतही जे लोक किमान सौजन्याने वागत नसतील अशा घराशी नातं प्रस्थापित करायला तुम्ही उत्सुक आहात का, असा प्रश्न मी जेव्हा विद्याताई आणि प्रतिभाताईंना विचारला तेव्हा त्यांच्या माना नकारार्थी हलल्या हे वेगळं सांगायला नकोच!

सौजन्याने वागण्याचा निश्चय असणारी पी. वेंकट सुब्बाराव या तेलुगु लेखकाने लिहिलेली प्रतिज्ञा, भारत सरकारने राष्ट्रीय प्रतिज्ञा म्हणून स्वीकारली, या गोष्टीला येत्या वर्षी म्हणजे २०१५ मध्ये पन्नास वर्षे पूर्ण होतील. यानिमित्ताने ज्यांना लग्न करायचं आहे, ज्यांना नवीन पिढीला जन्म देऊन वाढवायचं आहे, ज्यांना या समाजाचा जो मूळ पाया आहे ती कुटुंबव्यवस्था सुदृढ हवी आहे, अशा आपण सर्वांनी केवळ लग्न ठरवतानाच नव्हे तर आपल्या दैनंदिन आयुष्यातही सौजन्याने वागण्याचा आज निश्चय करुया. एक अनोखी श्रद्धांजली सुब्बारावना देऊन, विवाह ठरवण्याच्या आपल्या कार्यात येणारा अडथळा पार करण्याच्या दिशेने एक पाउल उचलूया!